# पनवेल महानगरपालिका

ता.पनवेल, जि.रायगड, पनवेल ४१० २०६

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दुरध्वनी कार्यालय: ०२२- २७४५८०४०/४१/४२ फॅक्सनं. : ०२२- २७४५२२३३

ई-मेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईट: www.panvelcorporation.com

**जा.क्र. पमपा/बांधकाम/६५२५/प्र.क्र.२०५/४१५६/२०२५** **दिनांक ०३/११/२०२५**

## आदेश

**विषय :- जनहित याचिका क्र. ७१/२०१३ Interim Application (Lodgin) No.२९११९ of २०२५ अंतर्गत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रस्त्यावरील खड्ड्यांच्या संदर्भात दिलेल्या निर्देशानुसार राज्यातील सर्व महानरपालिका/ नगर परिषद / नगर पंचायत यांनी समिती गठित करणेबाबत.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रस्त्यावरील खड्ड्याच्या संदर्भात जनहित याचिका क्र. ७१/२०१३ अन्वये दिनांक १३/१०/२०२५ रोजी दिलेल्या निर्देशानुसार राज्यातील सर्व महानरपालिका /नगर परिषद / नगर पंचायती यांनी समिती गठित करणे आवश्यक आहे. सदर निर्देशाच्या अनुषंगाने पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रशासकीय रचनेनुसार खालील प्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | समिती सदस्य | पदनाम |
|---|---|---|
| १ | आयुक्त, पनवेल महानगरपालिका, पनवेल | अध्यक्ष |
| २ | सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,रायगड | सदस्य सचिव |
| ३ | अतिरिक्त आयुक्त (I), पनवेल महानगरपालिका, पनवेल | सदस्य |
| ४ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील संबंधीत प्रशासकीय विभागाचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक (खारघर/कळंबोली/कामोठे/ खांदा कॉलनी/पनवेल/ तळोजा ) | सदस्य |
| ५ | शहर अभियंता, पनवेल महानगरपालिका, पनवेल | सदस्य |

वरील प्रमाणे समिती सदस्यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी त्यांच्याकडील जनहित याचिका क्र. ७१/२०१३ मधील आदेश Interim Application (Lodgin) No.२९११९ of २०२५ (For Intervention) अन्वये पारित केलेल्या आदेशानुसार व त्यामधील दिलेल्या सुचनेनुसार महानगरपालिका क्षेत्रात रस्त्यावरील खड्ड्याबाबत प्राप्त होणाऱ्या तक्रारीवर कार्यवाही करण्यासाठी तसेच खड्ड्यामुळे व उघड्या मॅन्होल मुळे अपघात झाल्यास अपघातग्रस्त नागरीकांना

किंवा त्यांच्या कायदेशीर वारसांना नुकसान भरपाई देणेबाबत कार्यवाही करण्याच्या दृष्टीने समिती सदस्यांनी वेळोवेळी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्र. ७१/२०१३ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार आवश्यक कार्यवाही पार पाडावी व पनवेल महानगरपालिका क्षेत्रात रस्त्यावरील खड्ड्यामुळे जिवीत हानी होणार नाही याकरीता आवश्यक उपाययोजना करण्यात यावी.

(मंगेश चितळे)
आयुक्त
पनवेल महानगरपालिका

**प्रत माहितीस्तव –**

**१. मा. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, बेलापूर भवन, महानगरपालिका इमारत ७ वा माळा, सी.बी.डी. बेलापूर,नवी मुंबई.**
**२. मा. सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड**
**३. अतिरिक्त आयुक्त (I), पनवेल महानगरपालिका, पनवेल**
**४. पनवेल महानगरपालिका हद्दीतील संबंधीत विभागाचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक**
**५. शहर अभियंता, पनवेल महानगरपालिका, पनवेल**